आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

८ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जम्मू आणि काश्मिर तसंच हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात

- भारतीय हवाई दलातर्फे ९२व्या वर्धापन दिनानिमित्त चेन्नईत विशेष कार्यक्रमाचं आयोजन

- केंद्रीय प्रत्यक्ष कर नियंत्रण मंडळाकडून प्राप्तीकर कायद्याच्या सर्वसमावेशक पुनरावलोकनासाठी अंतर्गत समितीची स्थापना

- ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण होणार

**आणि**

- आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला फिनलँड इथं आजपासून सुरुवात

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मिर तसंच हरियाणा विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीला आज सकाळी ८ वाजल्यापासून सुरुवात झाली. जम्मू काश्मीरमधे आतापर्यंत ९ जागांचे निकाल जाहीर झाले असून त्यात ३ ठिकाणी नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार तर ६ जागांवर भाजपा उमेदवार विजयी झाले आहेत. हरियाणात २ जागांचा निकाल जाहीर झाला असून काँग्रेस आणि भाजपचे उमेदवार प्रत्येकी एका जागेवर विजयी झाले आहेत. माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला बडगाम आणि गंदेरबाल या दोन्ही मतदारसंघात आघाडीवर आहेत. आतापर्यंत मिळालेल्या कलांनुसार एकूण ९० मतदारसंघांपैकी ३९ ठिकाणी नॅशनल कॉन्फरन्स, २३

ठिकाणी भाजपा, तर ६ ठिकाणी काँग्रेस उमेदवार आघाडीवर आहेत. पीडीपीचे उमेदवार ३ ठिकाणी तर अन्य उमेदवार ७ ठिकाणी आघाडीवर आहेत.

हरियाणात ९० मतदारसंघांपैकी ५१ ठिकाणी भाजपा उमेदवार आघाडीवर आहेत. काँग्रेस उमेदवार ३३ ठिकाणी तर भारतीय लोकदलाचा उमेदवार एका मतदारसंघात आघाडीवर आहे. ३ ठिकाणी अपक्ष उमेदवार आघाडीवर आहेत. मुख्यमंत्री नायबसिंग सैनी लडवा मतदारसंघात आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

भारतीय हवाई दल आज आपला ९२वा वर्धापन दिन चेन्नईच्या तांबरम इथल्या आपल्या तळावर साजरा करणार आहे. या निमित्ताने संचलन आणि हवाई प्रात्यक्षिकांचं सादरीकरण होईल. हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असतील. दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वायूसेना दिनानिमित्त भारतीय हवाई दलाला शुभेच्छा दिल्या आहेत. साहस आणि कठोर व्यावसायिक दृष्टिकोन ही हवाई दलाची वैशिष्ट्यं आहेत. आणि देशाच्या संरक्षणामध्ये त्यांनी निभावलेली भूमिका ही अत्यंत कौतुकास्पद आहे, असं प्रधानमंत्री आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय प्रत्यक्ष कर नियंत्रण मंडळाने १९६१च्या प्राप्तीकर कायद्याच्या सर्वसमावेशक पुनरावलोकनावर देखरेख करण्यासाठी अंतर्गत समितीची स्थापना केली आहे. या समितीचा उद्देश प्राप्तीकर कायद्याच्या स्वरुपाला संक्षिप्त, स्पष्ट आणि सुलभ करणे हा असून त्यामुळे कायदा समजून घेण्यास मदत होणार आहे. कायद्याचं पुनरावलोकन झाल्यानंतर त्याबाबत होणारे वाद आणि खटले यांचं प्रमाण घटावं तसंच कराच्या आकारणीबाबत अधिक निश्चितता यावी हा या मागचा उद्देश असल्याचं केंद्रीय अर्थ मंत्रालयाने म्हटलं आहे. या कायद्याच्या पुनरावलोकनासाठी अर्थमंत्रालयाने संबंधित तज्ज्ञ आणि जनतेकडून सूचना मागवल्या आहेत. या सूचना

आयकर विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जमा करता येतील, असं मंत्रालयानं कळवलं आहे.

<><><><><>

भारताच्या दौऱ्यावर असलेले मालदीवचे राष्ट्रपती महम्मद मुईज्जू आज आग्रा इथं ताजमहालाला सपत्नीक भेट देणार आहेत. आग्रा इथल्या विमानतळावर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या वतीने राज्यमंत्री योगेंद्र उपाध्याय त्यांचं स्वागत करतील. मुईज्जू यांच्या भेटीमुळे ताजमहाल सर्वसामान्यांसाठी दोन तास बंद ठेवला जाईल, अशी माहिती पुरातत्व खात्याच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे. त्यानंतर मुईज्जू आज मुंबई आणि उद्या बेंगळुरूला भेट देतील.

<><><><><>

क्षयरोग रूग्णांचा पोषण आहार वाढवण्यासाठी केंद्र सरकारतर्फे दिलं जाणारं पोषण आहार सहाय्य ५०० रुपयांवरुन एक हजार रुपये करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी आज नवी दिल्ली इथं ही माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत नी-क्षय मित्र उपक्रमाच्या विस्ताराला आणि क्षयरोग रुग्णांच्या कुटुंबांचाही या योजनेत समावेश करायला परवानगी दिली आहे. त्यामुळे सर्व क्षयरोग रुग्णांना आता नि-क्षय पोषण योजने अंतर्गत ३ हजार ते ६ हजार रुपयांपर्यंत पोषण सहाय्य मिळेल. त्याचा दरवर्षी २५ लाख क्षयरुग्णांना फायदा होईल, असंही नड्डा म्हणाले. या उपक्रमासाठी सरकारला अतिरिक्त १ हजार ४० कोटी रुपये खर्च होतील, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतानं जहाज बांधणीच्या क्षेत्रात २०३०पर्यंत पहिल्या दहांमध्ये तर २०४७पर्यंत पहिल्या पाचात स्थान मिळवण्याचं उद्दिष्ट ठेवल्याचं केंद्रीय नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. जर्मनीतल्या हॅम्बर्ग

सस्टेनिबिलिटी परिषदेत ते बोलत होते. अक्षय उर्जा क्षेत्रातल्या भारताच्या प्रगतीचाही त्यांनी यावेळी उल्लेख केला. २०१४पासून भारताने आपल्या नवीकरणीय उर्जा क्षमतेमध्ये परिवर्तनात्मक वाढ केली असल्याचंही ते म्हणाले. गेल्या दहा वर्षांत देशाची सौर उर्जा निर्मितीची क्षमता ३३ पटीने वाढली असून शाश्वत उर्जास्रोतांच्या शोधात भारत आज जागतिक पातळीवर समर्थपणे उभा असल्याचंही जोशी यांनी सांगितलं.

<><><><>

नवी दिल्ली इथं या महिन्याच्या १४ ते २४ दरम्यान आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या जागतिक दूरसंचार मानकीकरण परिषदेचं आयोजन केंद्र सरकारतर्फे केलं जाणार आहे. प्रथमच, आशिया-प्रशांत प्रदेशात या कार्यक्रमाचं आयोजन केलं जात आहे. या कार्यक्रमात ३ हजारांपेक्षा जास्त नेते आणि १९० हून अधिक देशांतील तंत्रज्ञान तज्ञ या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. 6G, कृत्रीम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, बिग डेटा, सायबर सुरक्षा, मशीन-ते-मशीन संवाद आणि क्वांटम तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रातील तंत्रज्ञान मानकांचं भविष्य घडवणं हे या कार्यक्रमाचं प्रमुख उद्दिष्ट आहे.

<><><><>

७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण होणार आहे. अभिनेते मिथून चक्रवर्ती यांना यावेळी दादासाहेब फाळके पुरस्कारान गौरवण्यात येणार आहे. याबरोबरच चित्रपट निर्मिती आणि अभिनयासाठीच्या इतर पुरस्कारांचंही वितरण होणार आहे. कन्नड चित्रपट कांतारा मधल्या अभिनयासाठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार तमिळ चित्रपट थिरूचित्रमबलमसाठी नित्या मेनन आणि गुजराती चित्रपट कच्छ एक्सप्रेससाठी मानसी पारेख यांना देण्यात येणार आहे. यासह अनेक पुरस्कारांचं वितरण यावेळी होईल.

<><><><><>

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या मार्गाची बांधणी, आरेखन आणि सामग्री पुरवठ्याकरता राष्ट्रीय हाय स्पीड रेल्वे महामंडळानं पात्र भारतीय आणि जपानी कंपन्यांकडून निविदा मागवल्या आहेत. मुंबईचं वांद्रे- कुर्ला संकुल ते गुजरातमधल्या झारोली स्थानकापर्यंत ३१४ किलोमीटर लांबीच्या बांधकामाचा त्यात समावेश आहे. बुलेट ट्रेनच्या मार्गाचा हा अखेरचा टप्पा असेल. महाराष्ट्रातली ४ स्थानकं आणि ठाण्याजवळ डेपोचं बांधकामही या टप्प्यात होईल.

<><><><><>

दिव्यांगाच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपकरणं आणि कृत्रिम अवयव उत्पादनांचं प्रदर्शन आज दुबईत सुरु झालं. भारताच्या केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयातर्फे कृत्रिम अवयव उत्पादन महामंडळाचं दालन प्रदर्शनात आहे. कृत्रिम अवयवांखेरीज चाकाच्या खुर्च्या, श्रवणयंत्रं इत्यादी विविध उत्पादनं दालनात मांडण्यात आली आहेत. सुमारे ५० देशांची मिळून अडीचशे दालनं प्रदर्शनात आहेत.

<><><><><>

बांबू लागवड आणि प्रक्रीया चळवळीचे प्रणेते पाशा पटेल यांना नरेडको या बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेनं हरित नायक पुरस्कार देऊन गौरवलं आहे.

<><><><><>

दार्जिलिंगच्या पद्मजा नायडू यांची हिमालयन झूलॉजिकल पार्कच्या रेड पांडा कार्यक्रमाची वाझा, अर्थात वर्ल्ड असोसिएशन ऑफ झूस अँड ॲक्वेरियम्स संवर्धन पुरस्कार २०२४ साठी अंतिम स्पर्धक म्हणून निवड झाली आहे. पद्मजा नायडू हिमालयन प्राणी उद्यानानं विविध संस्थांच्या सहकार्यानं अनेक पुनर्वसन उपक्रम हाती घेतले होते.

<><><><><>

मागच्या काही दिवसांच्या पडझडीनंतर आज दुपारी मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी उच्चांकी पातळीवर पोहोचले. सेन्सेक्स ३६६ अंकांनी वाढून ८१ हजार ४१६ अंकावर पोहोचला. तर निफ्टी १३१ अंकानी वाढून २४ हजार ९२७ अंकावर पोहोचला.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार, चित्रपट समिक्षिका आणि लेखिका नीला उपाध्ये यांचं काल रात्री मुंबईत चेंबुर इथं निधन झालं. त्या ७९ वर्षांच्या होत्या. चेंबुरच्या चरई विद्युत दाहिनीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

फिनलँड इथं आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून सुरुवात होणार आहे. भारताचे पीव्ही सिंधू, किदांबी श्रीकांत आणि लक्ष्य सेन यांच्यासह १२ क्रिडापटू स्पर्धेत सहभागी होत आहेत. या महिन्याच्या १३ तारखेपर्यंत या स्पर्धा होणार आहे.

**<><><><><>**

भारत आणि बांग्लादेशदरम्यान मर्यादित २० षटकांचा दुसरा क्रिकेट सामना उद्या नवी दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर खेळला जाणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ, तीन सामन्यांच्या मालिकेत १-० असा आघाडीवर आहे.

**<><><><><>**

महिलांच्या T२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज संध्याकाळी संयुक्त अरब अमिरातीतील शारजाह क्रिकेट स्टेडियमवर अ गटात ऑस्ट्रेलियाचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. यापूर्वी सामन्यात दोन्ही संघांनी आपले सुरुवातीचे सामने जिंकले होते.

**//<><><><><>//**